# नमुना दोन

ग्राम :- ठाणे

दुरध्वनी :-०२२-२५३६२४४५

ई मेल :- zpednprim@yahoo.in  फॅक्स:-

जावक क्रं. :-  दिनांक:-२०/०२/२०१३

जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय:- शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, ठाणे (महाराष्ट्र राज्य)

व्यवस्थापक **जय पुरियार ट्रस्ट.**

विषय: - **बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांचा बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २००९ याच्या नियम, ११ पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.**

माननीय महोदय/ महोदया,

आपल्या दिनांक ०५/०१/२०१३ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलाला पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणीच्या अधारे,

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प.ठाणे. **दिनांक ०१/०४/२०१३ पासुन दिंनाक ३१/०३/२०१६** पर्यंत तीन वर्षांच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी करिता जय पुरियार स्कुल सानपाडा** नवी मुंबई पिनकोड - **४०० ७०५** या इंग्रजी **(CBSE)** माध्यमाच्या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११(जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित घटकांतील बालकांस, पहिल्या इयत्तेत, त्या विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद तीन मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.
५. संस्था/ शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेत प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन ) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यन्त कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने/ शिक्षकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वःला गुंतवून घेवू नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समूचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमांचे पालन करील.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या ।

| | |
|---|---|
| ११. * शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ. | - ५००० चौ.मी |
| * एकुण बांधकाम क्षेत्र | :- ३९०० चौ.मी |
| * खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | :- २५०० चौ.मी |
| *वर्गखोल्या संख्या | :- १७ |
| कार्यालय- नि-भांडार-नि- मुख्याध्यापकाची खोली | :- ०३ |
| * मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे | आहे. मुलांसाठी-०९स्वच्छतागृह व १८ मुतारी संख्या<br>मुलीसाठी-०९ स्वच्छतागृह व ०९ मुतारी संख्या |

- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ

आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.-

| | |
|---|---|
| * पिण्याच्या पाण्याची सुविधा | आहे. नळयाच्या तोटया १९ ॲक्वागार्ड आहे. |
| * दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | योजना लागु नाही. |

JAIPURIAR SCHOOL NAVI MUMBAI 400705 SANPADA

१२. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१३. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्याच्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१४. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम१८६०(१८६०चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१५. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१६. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१७. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक ThMNC-NVMBI-P050असा आहे, हा या कार्यालयाशी कोणत्याही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१८. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१९. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

२०. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

आपला विश्वासू,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद ठाणे.

JAIPURIAR SCHOOL ★ SANPADA ★ NAVI MUMBAI 400705

Date:- 22/02/2013

UNDERTAKING

That I, Mr/Mrs. Ghorpade Vinod Suresh have been appointedas a Member of the Visiting Team to visit the school ---- Jai puriar School CBSE for verifying the facts submitted by the applicant for recognition / permission for running the school for pri school / high school.

2. I Certify that, I visited the school on 24/02/13. The report submitted by me under my signature is based on my actual visit to the school verification of the records and interaction with the Headmaster / Principal as per the guidelines supplied to me. There is nothing in my report which is contradictory to the facts.

3. That the ~~Videography~~ / photography has been done in the school on 24/02/13 and the have been submitted along with the report in a closed envelope signed by me.

4. That I certify that, the contents of the annexed report are true and correct to the best of my knowledge and on the basis of records of the school.

5. In the event of any part of my report is found to be incorrect. I Shall be personally responsible for that and The Education officer (pry) or Director of primary, pune May take suitalble action Hence undertaking certificate is given by me..

Place:- Turbhe Navi Mumbai

22/02/13

(Signature & Name and Designation)

JAIPURIAR SCHOOL ★ SANPADA ★ NAVI MUMBAI 400705

Date:- 22/02/2013

No. ________ & Date ________

Counter Signature

* Note :- Undertaking to be submitted by each member of the VT separately.

Administrative Officer